Literacy for a Billion

Movie: Jamla ho Jamla
Year: 1995

Song: Kuni jeetala kunee Harala
Lyricist:

लपून छपून जरा जपून
इश्काचं खेळावं
मैदान सोडून जाणाऱ्याला
कुणी कसं बोलावं
ऐन येळंला आले मी
साज नवतीचा ल्याले मी
ऐन येळंला आले मी
साज नवतीचा ल्याले मी
अंग अंगी मदन हा फिरला
आज खेळाला रंग भरला
ओ... आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना
करिती खाणाखुणा
गं टकमक बाई
कुणी जीतला कुणी हरला
कुणी जीतला कुणी हरला

सोळा शिणगाराचा कायदा केला असा
भेट घडवायचा वायदा केला असा
सोळा शिणगाराचा कायदा केला असा
भेट घडवायचा वायदा केला असा

लाडीगोडी मधी
छेडाछेडी मधी
लाडीगोडी मधी
छेडाछेडी मधी
कुणी लाजचा पडदा धरला
आज खेळाला रंग भरला
हो आज खेळाला रंग भरला

आली आली चतुर कामिना
करिती खाणाखुणा गं टकमक बाई
कुणी जीतला कुणी हरला
कुणी जीतला कुणी हरला

लई नवसानं गं योग आला जुळून
लई नवसानं गं योग आला जुळून
इंद्र दरबार गं कसा आला खुलून
इंद्र दरबार गं कसा आला खुलून
अशी करते अदा कैक झालं फिदा
अशी करते अदा कैक झालं फिदा
कुणी येडा बघून मनी झुरला
आज खेळाला रंग भरला
हां आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना
करिती खाणाखुणा
गं टकमक बाई
कुणी जीतला कुणी हरला
कुणी जीतला कुणी हरला

हो आज न्यारी लहर
आज न्यारा बहर
सारा पडला विसर
असा झाला कहर
हो आज न्यारी लहर
आज न्यारा बहर
सारा पडला विसर
असा झाला कहर
काळजाच्या कुपीत आज लपलं गुपित

Literacy for a Billion

काळजाच्या कुपीत आज लपलं गुपित
डाव अर्ध्यावरी आज उरला
आज खेळाला रंग भरला
हां आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना
करिती खाणाखुणा
गं टकमक बाई
कुणी जीतला कुणी हरला

कुणी जीतला कुणी हरला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*